# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२५ दिनांक : - २५ जुन २०२५

---

**जळगाव दि.२५ (प्रतिनिधी)** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेतील ८ विद्यार्थ्यांची परिसर मुलाखतीमध्ये निवड झाली असुन कुलगुरु प्रा.व्ही.एल.माहेश्वरी यांच्या हस्ते त्यांना नियुक्ती पत्रे आज दि. २५ जुन रोजी देण्यात आली.

माहे जुन मध्ये विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत विप्रो लि., नोसिल लि., ग्रिन जोल्स व कल्प चर प्रॉडक्स प्रा.लि. या विविध कंपन्यांच्या परिसर मुलाखती विद्यापीठात रसायन तंत्रज्ञान संस्थेच्या विद्यार्थ्यांकरीता आयोजित करण्यात आल्या होत्या. या परिसर मुलाखतीमधुन विप्रो लि., या कंपनीत सिध्दार्थ बागले, कार्तिक मराठे, कुणाल पाटील व मनोज पाटील यांची निवड करण्यात आली आहे. नोसिल लि.या कंपनीत प्रविण ठाकरे, ग्रिनजोल्स या कंपनीत आदित्य गायकी व तेजस खोरगडे, आणि कल्प चर प्रॉडक्टस प्रा.लि. या कंपनीत वेदांत मंडाळे यांची अशा एकुण आठ विद्यार्थ्यांची निवड झाली असुन त्यांना कुलगुरुंच्या हस्ते नियुक्ती पत्रे दि. २५ जुन रोजी देण्यात आली. यावेळी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, कुलसचिव डॉ.विनोद पाटील,अधिष्ठाता प्रा.अनिल डोंगरे, संस्थेचे संचालक प्रा.अजयगीरी गोस्वामी, कक्षाचे समन्वयक प्रा. उज्वल पाटील, प्रा.राजकुमार सिरसाम, प्लेसमेंट ऑफिसर सोनाली दायमा हे उपस्थित होते.

**बातमी क्र. २**

**जळगाव दि.२५ (प्रतिनिधी)** : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे प्रशाळेतील समाजकार्य विभाग, विद्यापीठ संचलित नंदुरबार येथील आदिवासी अकादमी आणि संलग्नीत समाजकार्य महाविद्यालयातील समाजकार्य विषयाच्या (एम.एस.डब्ल्यु.) पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षाची केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन प्रवेशप्रक्रीया सुरु झाली असुन अर्ज करण्याची मुदत ७ जुलै पर्यंत देण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता एम.एस.डब्ल्यु. प्रथम वर्ष अभ्यासक्रमाची केंद्रीय पध्दतीने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया दि. २४ जून, २०२५ पासून सुरु झाली असुन प्रवेश प्रक्रियेबाबत प्रवेश माहिती पुस्तीका (Information Brochure), ऑनलाईन माहिती व नोंदणी अर्ज इ. विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी नोंदणी शुल्क रु.६००/- Online Payment Getway द्वारे भरण्याची सुविधा नोंदणी अर्जासोबत उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. विद्यार्थ्यांनी User ID / Password तयार करुन, Registration करावे. सर्व कागदपत्रे स्कॅन करुन प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रावर (ARC) अपलोड (Upload) करावयाची आहे. विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज व आवश्यक असणारे सर्व कागदपत्रे जवळच्या प्रवेश अर्ज स्विकृती केंद्राला (ARC) दि. २४ जून, २०२५ ते ०८ जुलै, २०२५ दरम्यान जाऊन अर्ज व कागदपत्रांचे व्हेरीफीकेशन करावयाचे आहे.

ज्या विद्यापर्थ्यांनी प्रवेश परीक्षेसाठी अर्ज केले आहे अशा विद्यार्थ्यांची प्रवेश परीक्षा (CET) दि. १२ जुलै, २०२५ रोजी दुपारी १२.०० ते ०.१.०० वाजेपर्यंत जळगाव जिल्हा- समाजिकशास्त्रे प्रशाळा, कवयित्री

बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, धुळे जिल्हा- विद्यावर्धिनी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धुळे व नंदुरबार जिल्हा- जी.टी.पी. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, नंदुरबार या परीक्षा केंद्रांवर ०१ तास १०० गुणांची बहूपर्यायी (MCQ) पध्दतीने प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे.

केंद्रीय प्रवेश प्रक्रियेच्या ऑनलाईन दोन फे-या (I & II Round) होतील. प्रवेश नोंदणी प्रक्रिया पुर्ण झाल्यावर, सामान्य यादी जाहीर होईल. त्यानंतर गुणवत्ता यादीवर काही आक्षेप असल्यास ते नोंदवता येतील. त्यानंतर अंतिम यादी जाहिर केली जाईल. प्रवेशासाठी पहिली व दुसरी फेरीचे वेळापत्रक विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर वेळोवेळी जाहीर करण्यात येईल. विद्यार्थ्यांना CAP Round द्वारे Online Allotment करण्यात येणार आहे. पहिल्या फेरीनंतर विद्यार्थ्यांच्या इच्छेप्रमाणे महाविद्यालय न मिळाल्यास Freeze आणि Float असे दोन पर्याय देण्यात आलेले आहेत. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करुन पुढील पैकी जवळच्या प्रवेश अर्ज स्विकृती केंद्रांवर (ARC) व्हेरीफीकेशन करावे. सुविधा केंद्र (ARC) ची नावे विद्यापीठ संकेतस्थळावर देण्यात आली आहे. सदर प्रवेश प्रक्रियेत काही अडचण आल्यास डॉ. दाऊदी हुसैन, पध्दती विश्लेषक यांच्याशी दूरध्वनी क्र. ०२५७ – २२५७१५८ वर किंवा ई-मेल cap@nmu.ac.in यावर संपर्क साधावा, अशी माहिती प्रा. किशोर एफ. पवार, कार्याध्यक्ष, एम.एस.डब्यु. (प्रथम वर्ष) ऑनलाईन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती यांनी कळविलेले आहे.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता